MHNS070010612024

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २६/०४/२०२४ |
| नोंदणी दिनांक | : | २६/०४/२०२४ |
| निकाल दिनांक | : | ०३/०१/२०२५ |
| कालावधी | : | व म दि<br>००. ०८. ०८. |
| **निशाणी क्र.** | : | <u>२०</u>. |

## <u>विशेष न्यायाधीश, मालेगाव यांचे न्यायालयात, मालेगाव</u>

तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक

(पिठासीन अधिकारी— एस.यु. बघेले)

**<u>विशेष (पोक्सो) खटला क्र.५३/२०२४</u>**

महाराष्ट्र शासन,
मार्फत पोलीस निरीक्षक,
जायखेडा पोलीस ठाणे,
ता. सटाणा, जि. नाशिक. **...अभियोग पक्ष**

**विरुध्द**

**** **...आरोपी**

**<u>गुन्हा</u>**: भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३६६—क, ३७६(२) व बालकांचे लैंगिक अपराधापासून सरंक्षण अधिनियम,२०१२ चे कलम ६ अन्वये.

अभियोग पक्षातर्फे श्री.एम.एस.फुलपगारे सरकारी अभियोक्ता.
आरोपीतर्फे श्री.अमीन मुस्तफा, वकील.

**<u>तोंडी न्यायनिर्णय</u>**

(पारित दिनांक ०३/०१/२०२५)

१. आरोपीवर भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३६६—क, ३७६(२) व बालकांचे लैंगिक अपराधापासून सरंक्षण अधिनियम २०१२ चे कलम ६ अन्वये खटला चालविण्यात आला. पीडितेची ओळख लपविण्याकरिता पीडिता व तिच्या नातेवाईकांचे नाव गुप्त ठेवण्यात येत आहेत. अभियोग पक्षाचा खटला थोडक्यात खालीलप्रमाणे :—

२. पीडिता ही फिर्यादीची मुलगी आहे. दिनांक १०/०५/२०१९ रोजी फिर्यादी पीडितेसोबत त्यांच्या वाडीपिसोळ, ता. सटाणा, जि. नाशिक येथील घरी झोपली होती. मध्यरात्रीनंतर फिर्यादीला जाग आली असता तिला पीडिता तिच्या अंथरूणात दिसली नाही. पीडितेचा शोध घेवून देखील पीडिता मिळून न आल्याने फिर्यादीने अज्ञात इसमाविरूध्द जायखेडा पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली. सदर फिर्याद गु.र.क्र.८०/२०१९ अन्वये नोंदविण्यात आली.

३. तपासादरम्यान पीडिता व आरोपी मिळून आले. आरोपीला अटक करण्यात आली. पीडिताचा व साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. घटनास्थळाचे पंचनामे करण्यात आले. पीडिताच्या जन्मतारखेबाबतचा पुरावा प्राप्त करण्यात आला. पीडिताचे व आरोपीचे कपडे पंचनाम्यान्वये जप्त करण्यात येवून त्याबाबतची मुद्देमाल पावती बनविण्यात आली. पीडिता व आरोपी यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येवून त्याबाबतचे वैद्यकीय दाखले प्राप्त करण्यात आले. पीडितेचा व फिर्यादीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ अन्वयेचे जबाब नोंदविण्यात आले. जप्त मुद्देमाल तपासणीकामी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविण्यात आला. तपासाअंती निष्पन्न झाले की, पीडिता ही अल्पवयीन असल्याचे आरोपीला माहीत असून देखील त्याने पीडितेला फुस लावून तिला तिच्या घरापासून दूर, कोडीनाल, गुजरात येथे नेवून तिच्यासोबत तेथे वास्तव्य केले. त्यानंतर

आरोपी पीडितेला लामकाणी, जि. धुळे येथे घेवून गेला व तेथे त्याने पीडितेसोबत वास्तव्य केले. सदर दोन्ही ठिकाणांच्या वास्तव्याच्या कालावधीत आरोपीने पीडितासोबत वारंवार शारीरिक संबंध केले. पीडितेला आरोपीपासून एक मुलगी देखील झाली. आरोपीविरूध्द पुरावा मिळून आल्यामुळे त्याच्याविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३६३, ३६६अ, ३७६(३) व बालकांचे लैंगिक अपराधापासून सरंक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४ व ८ अन्वये हया न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३६६—क, ३७६(२) व बालकांचे लैंगिक अपराधापासून सरंक्षण अधिनियम २०१२ चे कलम ६ अन्वये दोषारोप निश्चित करण्यात आला. आरोपीने त्याच्यावरील आरोप फेटाळून लावले व खटला चालविण्याची विनंती केली. आरोपीने त्याच्या बचावात अभियोग पक्षाचे संपुर्ण कथन नाकारले आहे.

५. दोन्ही पक्षांचे परस्परविरोधी कथन विचारात घेता माझे अवलोकनार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपीने अज्ञान पीडित मुलीसोबत विधिनिषिध्द संभोग करण्याची बळजबरी करता यावी किंवा त्यासाठी तिला फुस लावता यावी या उद्देशाने तिला तिच्या राहत्या घरापासून दूर जाण्यास प्रवृत्त केले, ही बाब अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही |
| २. | आरोपीने पीडितेवर वारंवार बलात्कार केला, ही | नाही |

बाब अभियोग पक्ष सिध्द करतो काय?

| | | |
|---|---|---|
| ३. | आरोपीने पीडितेसोबत वारंवार पेनीट्रेटिव्ह सेक्युअल ॲसॉल्ट केला व तिला गर्भवती केले केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ४:—**

६. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षाने एकूण दोन साक्षीदार तपासले व काही दस्तांवर त्यांची भिस्त ठेवली. सा.क्र.१ म्हणजेच फिर्यादी यांनी कथन केले की, पीडिता त्यांची मुलगी आहे. घटनेच्या वेळी पीडितेचे वय १८ वर्ष होते. आरोपी पीडितेला घेवून गेला व तिच्यासोबत त्याने शारीरिक संबंध केले असल्याची बाब त्यांनी नाकरली आहे. सदर साक्षीदाराने फिर्यादवरील त्यांचा अंगठयाचा ठसा ओळखला आहे परंतु त्यातील मजकूर त्यांना माहीत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. सा.क्र.२ पीडितेने तिच्या पुराव्यात कथन केले आहे की तिला घटनेबाबत काही माहीत नाही. पोलिसांनी तिचा जबाब घेतला नव्हता. आरोपी तिला घेवून गेला होता व तिच्यासोबत त्याने शरीरसंबंध केले असल्याची बाब तिने नाकरली आहे. सदर दोन्ही साक्षीदारांना सरकारी वकिलांनी परवानगीनिशी विरुध्द पक्ष विचारु शकतो त्याप्रमाणे प्रश्न विचारले, परंतू सदर दोन्ही साक्षीदारांच्या तोंडून अभियोग पक्षाला मदत करणारी कोणतीही बाब त्यांना पुढे आणता आली नाही. अशा प्रकारच्या उलटतपासात सदर दोन्ही साक्षीदारांनी त्यांचा फौ.प्र.सं.कलम १६४ चा जबाब निशाणी क्र.१० व १२

वरील त्यांचा अंगठयाचा ठसा व स्वाक्षरी ओळखली असली तरी त्यातील मजकूर त्यांना माहीत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

७. सदर प्रकरणातील महत्वपूर्ण साक्षीदार फिर्यादी (सा.क्र.१) व पीडिता (सा.क्र.२) यांनी अभियोग पक्षाची साथ दिलेली नाही. त्यांच्या पुराव्यातून आरोपीने पीडितेला फुस लावून पळवून नेले व तिच्यावर लैगिक अत्याचार केल्याबाबतची कोणतीही बाब पुढे येत नाही. सदर प्रकरणात इतर साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. बचाव पक्षाने जरी घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र.१३, वैद्यकीय दाखले निशाणी क्र.१४ ते १६, पीडिता व आरोपीचे कपडे जप्तीचे पंचनामे निशाणी क्र.१७ व १८ इत्यादी दस्त मान्य केले असले तरी केवळ सदर दस्तांवर विसंबून आरोपीला गुन्हयात गोवणारा निष्कर्ष काढता येणार नाही. तसेच फौ.प्र.सं.कलम १६४ अन्वयेचे निशाणी क्र.१० व १२ वरील जबाब जरी शाबीत करण्यात आले असले तरी फौ.प्र.सं.कलम १६४ अन्वयेचा जबाब हा मुख्य पुरावा नसून तो पुरक पुरवा आहे. त्यामुळे दप्तरी उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुराव्याच्या आधारे आरोपीला गुन्हयात गोवणारा पुरावा मिळून येत नाही. पीडितेने तिच्या पुराव्यात तिने आरोपीसोबत लग्न केले असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे सीआयएस प्रणालीत न्यायनिर्णय अपलोड करतांना पीडितेचे नाव गुप्त ठेवण्याकरिता आरोपीचे नाव देखील गुप्त ठेवणे आवश्यक आहे. हया संदर्भात आवश्यक ते आदेश हया न्यायनिर्णयाच्या परिणामक आदेशमध्ये करण्यात येत आहेत.

८. वरीलप्रमाणे साक्षीदारांच्या साक्षीवरुन दिसून येते की आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करणे इतपत पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. सबब सर्व मुद्यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येते व खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपीची भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३६६—क, ३७६(२) व बालकांचे लैंगिक अपराधापासून सरंक्षण अधिनियम २०१२ चे कलम ६ अन्वयेच्या गुन्हयांतून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा जामिनकदबा रद्द करण्यात येतो आणि त्याच्या जामिनदाराला सदर खटल्यातून हमीमुक्त करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल, मानवी पेहरावाची कपडे, मुल्यहीन असल्याने अपीलाचा कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावे.

४. जप्त मुद्देमाल, एक काळया रंगाची पॅशन प्रो मोटारसायकल क्र.एम.एच. ४१—ए.व्ही.—८२३२ ही तिच्या मुळ मालकास सुपूर्तनाम्यावर यापुर्वीच परत करण्यात आली आहे, सदरचा सुपूर्तनामा अपिलाचा कालावधी संपल्यानंतर रद्द होईल.

५. आरोपीने स्वतंत्रपणे रु. १५,०००/— चे वैयक्तिक बंधपत्र व जामिनकदबा संदर्भात फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—क अन्वये पुर्तता करावी.

६. सदर प्रकरणातील न्यायनिर्णय सीआयएस प्रणालीत अपलोड करतांना आरोपी हा पीडितेचा पती असल्यामुळे पीडितेची ओळख गुप्त ठेवण्याकरिता न्यायनिर्णयातील आरोपीचे नाव व पत्ता काढून त्या जागी '****' असे नमूद करावे.

SANJAYSINGH UMEDSINGH BAGHELE

Digitally signed by SANJAYSINGH UMEDSINGH BAGHELE
Date: 2025.01.03 17:52:29 +0530

दिनांक: ०३/०१/२०२५ (एस.यु. बघेले)
स्थळ : मालेगांव विशेष न्यायाधीश, मालेगाव